# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/09/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत कावरापेठ उमरेड येथे दिनांक ०५/०९/२०२३ चे १८.३० वा. ते २१.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– अल्का रामचरण कपूर, वय ३६ वर्ष, रा. कावरापेठ पावनधाम उमरेड हिला एका अनोळखी व्यक्तीने फोन करून ''मै आपका युपीआय बंद कर रहा हू और सायबर नंबर १९३० इस नंबर पर कम्प्लेंट करो'' असे बोलून फोन ठेवला त्यानंतर फिर्यादीने फोन पे बॅलेन्स चेक करण्याचा प्रयत्न केला असता युपीआय बंद झाल्याने बॅलेन्स दिसत नव्हते दुसऱ्या दिवशी दिनांक ०६/०९/२०२३ रोजी फिर्यादी स्टेट बॅक ऑफ इंडीया शाखा उमरेड येथे जावून खात्यावरील बॅलेन्स चेक केले असता फिर्यादीचे खात्यातून ९४,०००/–रू, युपीआय मार्फतीने कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काढल्याचे समजले कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीची ऑनलाईन फसवणूक करून ९४,०००/– रूपये खात्यातून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. घोंगे मो. नं. ९९२३३७४२९० हे करीत आहे.

## वाघाच्या हल्ल्याने इसमाचा अकस्मात मृत्यू

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील खंडासा पांधन रोड करवई शिवार येथे दिनांक १९/०९/२०२३ चे १७/०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे– यशवंतराव सिताराम वैदय, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्रमांक ३ खंडासा ता. कुरई जि. सिवनी म. प्र.** हा खंडासा करवई जंगल शिवारात २० ते २५ गाई व म्हशी घेवुन चारण्याकरीता गेला असता दररोज प्रमाणे सायंकाळी ०६/०० वा. दरम्यान घरी परत आला नाही यातील फिर्यादी नामे– निलेश यशवंतराव वैदय, वय २३ वर्ष रा. वार्ड क्र. ३ खंडासा ता. कुरई जि. सिवनी म .प्र. (मृतकचा मुलगा) यांनी त्याच्या आईस बाबा घरी आले नाही का? असे विचारले तर 'नाही' असे सांगीतले वरून फिर्यादी यांनी मृतकचा शोध घेण्याकरीता खंडासा करवई जंगल शिवारात पाहण्या करीता गेले असता वडील हे मृत अवस्थेत पडुन दिसले जवळ जावुन पाहणी केली तर कोणत्या तरी प्राण्याने (वाघाने) हल्ला करून त्यांचे मानेला व डाव्या पायाच्या मांडीचे पुर्ण मास खाल्लेल्या अवस्थेत दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास महिला पोलीस हवालदार आशा कुंभरे पोस्टे देवलापार ९९२३२३६६८६ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर